**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
जा.क्र.:नका/कार्य/२०१५-१६/ 9269 दिनांक 22/०९/२०१५

**परिपत्रक**

विषय :- लोकनृत्य स्पर्धा २०१५-१६

मंडळाच्या वतीने भारतीय लोककलेची नव्या पिढीला माहिती व्हावी, समाजातील विविध नृत्य प्रकार एकत्रित पाहता यावीत तसेच कलावंताच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने गट स्तरावर लोकनृत्य स्पर्धाचे आयोजन करण्यात येते.

मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे सन २०१५-१६ या चालू आर्थीक वर्षात माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये सर्व गट स्तरावर लोकनृत्य स्पर्धा आयोजित करावी.

गटस्तरीय लोकनृत्य स्पर्धेचे नियम व अटी

१) कलाकारांचे वय १८ वर्षा पेक्षा कमी असु नये.
२) स्पर्धेत भाग घेणारे कलावंताच्या एकूण संख्येच्या ५०% कलावंत हे कामगार/कामगार कुंटूबीय असणे आवश्यक आहे.वादकांना ही अट राहणार नाही.
३) संघात कमीत कमी ८ कलाकार आणि ४ साथीदार असे मिळून एकुण १२ कलावंत असावे. किंवा जास्तीत जास्त १२ कलाकार आणि ४ साथीदार असे मिळून एकुण १६ कलावंत असावे.
४) प्रत्येक संघास लोकनृत्य सादर करण्यासाठी ८ ते १२ मिनीटे एवढा वेळ राहील.
५) स्पर्धा सुरु होण्या पुर्वी भाग घेणाऱ्या संघानी स्पर्धेच्या ठिकाणी २ तास अगोदर उपस्थित राहून संयोजकाकडे आपल्या उपस्थितीची नोंद करावी.
६) परिक्षकांनी दिलेला निर्णय हा अंतीम राहील. त्यात कोणताही बदल केला जाणार नाही.
७) स्पर्धेमध्ये पारंपारिक वेषभूषा व वाद्याचांच वापर करण्यात यावा.
८) गटस्तरावर केंद्रांच्या संघाना कमीत-कमी दराचा प्रवास खर्च व सादरीकरण खर्च व विजेत्या संघाना बक्षिसे मंडळाच्या वतीने देण्यात येईल.
९) सदर स्पर्धेत सादर करण्यात येणारे नृत्य हे लोकनृत्य या प्रकारावर आधारित असावे. ध्वनिफीतीवर केलेले नृत्य ग्राह्य मानले जाणार नाही.
१०) लोकनृत्य स्पर्धा सुरु झाल्यानंतर स्पर्धा संपेपर्यंत प्रत्येक संघाने स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

२..

लोकनृत्य स्पर्धातील विजेत्या संघाना व कलावंतांना खालील प्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

| अ.क्र. | तपशिल | मंजूर रक्कम | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम | द्वितीय | तृतीय |
| १. | उत्कृष्ट संघ बक्षिस | २०००/- | १५००/- | १०००/- |
| २. | १० पेक्षा जास्त संघ असल्यास प्रत्येकी रु.७५०/- प्रमाणे दोन उत्तेजनार्थ | १५००/- | | |
| ३. | सादरीकरण खर्च प्रत्येकी रु.२०००/- प्रमाणे | प्रत्यक्ष | | |

वरील प्रमाणे नियम व अटींची अंमलबजावणी करुन गट प्रमुखांनी लोकनृत्य स्पर्धेचे आयोजन करावे. विभाग प्रमुखांनी सदर परिपत्रकाच्या अंमलबजावणी बाबत योग्य ती कार्यवाही करावी. सदरचे परिपत्रक चालू आर्थिक सन २०१५-१६ वर्षापासून पुढील आदेश निघेपर्यन्त अंमलात राहिल.

कल्याण आयुक्त

प्रत:-

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.
२) लेखा अधिकारी / लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई
३) प्रसिध्दी व जनसंपर्क विभाग, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.
४) सहायक कल्याण आयुक्त, विभागिय कार्यालय, मुंबई / ठाणे /पुणे / नाशिक/ अकोला/ नागपूर
५) प्र. सहायक कल्याण आयुक्त, विभागिय कार्यालय,औरंगाबाद
६) सर्व सहाय्यक लेखा अधिकारी,(७) विभागीय कार्यालय
७) सर्व कामगार कल्याण अधिकारी (१८ गट कार्यालये). ★ ★ ★
८) मा.कल्याण आयुक्तांचे स्वीय सहाय्यक,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई
९) सर्व केंद्र प्रमुख

★ ★ ★ यांनी सदरचे परिपत्रक सर्व केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन दयावे.